# ३७वा

## वार्षिक अहवाल सन २०१८-१९

स्थापना १९८२

# शिवकृपा

## सहकारी पतपेढी लि., मुंबई

नोंदणी क्र : बी.ओ.एम./आर.एस.आर./एस/१८६२-१९८२




## महाराष्ट्र शासनाचा 'सहकार भूषण' पुरस्कार प्राप्त संस्था


प्रशासकीय कार्यालय :

१, जय टॉवर, पहिला मजला, पुंजानी इस्टेट समोर, कॅडबरी जंक्शन, खोपट, ठाणे (प.) - ४०० ६०१. फोन : २५४४६०११/१४/१५/१६

# संचालक मंडळ

## सन २०१६ ते २०२१


**श्री. कृष्णा तु. शेलार**
संस्थापक व अध्यक्ष


**श्री. वसंत खा. चव्हाण**
उपाध्यक्ष


**श्री. चंद्रकांत श्री. वंजारी**
संस्थापक संचालक


**श्री. अविनाश ता. भोसले**
संचालक


**श्री. भिमराव दि. बोराडे**
संचालक


**श्री. पंढरीनाथ ता. भोसले**
संचालक


**श्री. जयवंत ग. खामकर**
संचालक


**श्री. अशोक ज्ञा. तुपे**
संचालक


**श्री. बबन ए. काटे**
संचालक


**श्री. शिवाजी रा. वरुडे**
संचालक


**ॲड. अशोक तु. शिंदे**
संचालक


**श्री. दिपक स. संकपाळ**
संचालक


**श्री. महेश शि. देशमुख**
संचालक


**सौ. अपर्णा अ. शिंदे**
संचालिका


**सौ. वर्षा दि. कळंबे**
संचालिका


**श्री. पांडुरंग वि. घाडगे**
तज्ञ संचालक


**श्री. दिपक उ. येवले**
संचालक (कर्मचारी प्रतिनिधी)


**श्री. चंद्रकांत ह. शेळके**
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक

# शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई

(नोंदणी क्र.: बी.ओ.एम/आर.एस.आर/एस/१८६२-१९८२)
**नोंदणीकृत कार्यालय :** २१९/३१११, टागोर नगर, ग्रुप नं.१, डॉ. आंबेडकर चौक, विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०० ०८३. फोन : २५७४६०३५
**प्रशासकीय कार्यालय :** १, जय टॉवर, पहिला मजला, कॅडबरी जंक्शन, खोपट, ठाणे (प.)-४००६०१. फोन : २५४४६०११/१४/१५/१६
**Website :** www.shivkrupapatpedhi.com, **E-mail :** admin@shivkrupa.in

## सदतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०१८-१९

सन्माननीय सभासद,

आपल्या संस्थेची **सदतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक ८ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ९.३० वा. विकास हायस्कूल, कन्नमवार नगर नं. २, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०८३** येथे खालील नमूद केलेल्या विषयांच्या कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी आपण या सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

### सभेपुढील विषय

१) दिनांक ५ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.
३) सन २०१८-१९ या अहवाल सालातील नफा विभागणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती देणे व नोंद घेणे.
७) संचालक मंडळाने कर्जफेडीसाठी अक्षम ठरलेल्या सभासदांच्या कर्जावरील व्याजामध्ये अंशतः सुट दिलेल्या रकमेस मंजूरी देणे.
८) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकांच्या निर्देशांची नोंद घेवून कार्यवाही करणे.
९) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
१०) सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी कायदा / नियम यामधील तरतूदीनुसार बाहेरील कर्ज मर्यादा व जबाबदारी निश्चित करणे.
११) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता शासकीय लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे शुल्क ठरविणे.
१२) वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार अनुत्पादित कर्ज प्रस्तावांची नावे बाकी वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करण्यास मान्यता देणे.
१३) संस्थेच्या स्वतःच्या मालकीच्या जागा विक्री करण्यासाठी केलेल्या व्यवहारास कार्योत्तर मंजूरी देणे.
१४) सन २०१६ मध्ये संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे.
१५) संस्थेच्या उपविधीतील पोटनियमामध्ये संचालक मंडळाने सुचविलेल्या दुरुस्तीस मंजूरी देणे.
१६) संस्थेच्या कार्यालयांसाठी इमारत / जागा खरेदी करणेबाबत.
१७) क्रियाशील व अक्रियाशील सभासदांच्या वर्गवारीची नोंद घेणे.
१८) विविध प्रकारच्या निधींच्या नियमावलीस मंजूरी देणे.
१९) ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
२०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला नम्र,

**चंद्रकांत ह. शेळके**
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यलक्षी संचालक,
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई
दिनांक : २४ ऑगस्ट २०१९

### विशेष सुचना :

१) गणसंख्ये अभावी ही सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना वार्षिक अहवाल/कामकाजासंबंधी काही सूचना द्यावयाच्या असतील, अशा सभासदांनी त्या लेखी स्वरूपात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पूर्वी सादर कराव्यात. आयत्यावेळी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

## सदतीसावा वार्षिक अहवाल सन २०१८-२०१९

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असलेल्या आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत !

संचालक मंडळाच्या वतीने आपल्या संस्थेचा सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील कामगिरीचा अहवाल आपल्यासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

सन २०१७-१८ मध्ये पतसंस्थांना आयकर कायदयातील कलम २६९ एसएस व कलम २६९ एसटी ही दोन कलमे लागू करण्यात आली. त्यामुळे एका दिवशी सभासदांकडून रोख रक्कम स्विकारणे व त्यांना रोख रक्कम परत देणे यावर मर्यादा आल्या. तसेच पतसंस्थांना केवळ सभासदांशीच व्यवहार करण्याचे निर्बंध आले आहेत. परिणामी, ठेवी व कर्ज अदा करणे तसेच रोख रकमा स्विकारण्यावर मर्यादा आल्या. अशा परिस्थितीवर मात करीत संस्थेच्या सभासद व ठेवीदारांचा विश्वास व सहकार्य याद्वारे आपली संस्था उत्तमप्रकारे प्रगतीची वाटचाल करीत आहे. हे आपणासमोर सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक यावरुन दिसून येईल.

## विशेष उल्लेखनीय बाबी

**पुरस्कार :-**

संस्थेचे व्यवस्थापन व्यावसायीक पध्दतीने करीत असताना सहकार कायद्याची अंमलबजावणी, सहकारातील मुलतत्वाची जपणूक आणि पोटनियमातील निकषांचे काटेकोरपणे पालन करीत संस्थेचे कामकाज सुरु आहे. त्याची दखल घेवून महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने संस्थेस मानाचा **'सहकार भूषण'** हा पुरस्कार देवून गौरविले आहे. हा पुरस्कार दिनांक ३१ आक्टोंबर २०१८ रोजी सहकार मंत्री मा. ना. श्री. सुभाष (बापू) देशमुख यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्र राज्य परिषदेचे अध्यक्ष मा. ना. श्री. शेखर चरेगांवकर साहेब, सहकार सचिव श्रीमती आभा शुक्ला, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य मा. श्री. सतीशजी सोनी यांच्या उपस्थितीत संस्थेस प्रदान करण्यात आला.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीत दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ने दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी राज्यस्तरीय **'दिपस्तंभ पुरस्कार'** देवून संस्थेस गौरविण्यात आलेले आहे. संस्थेस प्राप्त झालेले पुरस्कार ही बाब आपणा सर्वांसाठी विशेष अभिनंदनीय आहे.

**शिवकृपा भवन :-**

संस्थेचा वाढता शाखा विस्तार व व्यवसायाचा वाढता व्याप लक्षात घेवून संस्थेने प्रशासकीय कार्यालयासाठी रबाळे, नवी मुंबई येथे स्वत:च्या मालकीची १० गुंठे जागा खरेदी केलेली आहे. या जागेवर प्रशस्त व सुसज्ज ७ मजली शिवकृपा भवन इमारतीचा भूमीपूजन सोहळा परमपूज्य काडसिध्देश्वर स्वामीजी, मठाधिपती, सिध्दगिरी मठ, कणेरी, कोल्हापूर यांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक १ सप्टेंबर २०१८ रोजी संपन्न झाला. लवकरच आधुनिक तंत्रज्ञानाने अद्ययावत असे प्रशासकीय कार्यालय ग्राहक सेवेत कार्यान्वित करण्याचा संचालक मंडळाचा मनोदय आहे.

**३४०५ कोटी संमिश्र व्यवसायाची संकल्पपुर्ती :-**

संस्थेने ग्राहकांना दिलेली दर्जेदार सेवा, ग्राहकांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास यामुळे दि. ३१ मार्च २०१९ अखेर रु. ३४०५ कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. ही बाब संस्थेच्या व आपणा सर्वांच्या दृष्टीने अभिनंदनीय व अभिमानास्पद आहे.

## शाखा विस्तार :-

अहवाल सालात मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पूणे यांनी संस्थेस मुंबईमध्ये मालाड व भायखळा, ठाणे जिल्ह्यामध्ये कल्याण (पू) व शहापूर, पुणे जिल्ह्यामध्ये नारायणगांव व शिक्रापूर, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कागल व गडहिंग्लज, सांगली जिल्ह्यामध्ये मिरज व तासगांव, सोलापूर जिल्ह्यामध्ये सोलापूर शहर व टेंभूर्णी त्याचप्रमाणे रत्नागिरी व नाशिक रोड अशा एकूण १४ नवीन शाखा सुरू करणेस मंजूरी दिली आहे. लवकरच या सर्व शाखा ग्राहक सेवेत कार्यान्वीत करून संस्था १०० शाखांचा आकडा पार करेल याचा अभिमान वाटतो.

## स्वत:च्या मालकीची शाखा कार्यालये :-

अहवाल सालात एक प्रशासकीय कार्यालय, ०७ विभागीय कार्यालये व एकूण ८७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेच्या एकूण ९५ कार्यालयांपैकी ४१ कार्यालये स्वत:च्या मालकीच्या जागेत कार्यरत आहेत. संस्थेची अधिकाधिक शाखा कार्यालये स्वत:च्या मालकीची असावीत यासाठी संचालक मंडळ सदैव प्रयत्नशील आहे. त्याअनुषंगाने अहवाल सालात संस्थेने वडुज, ऐरोली व सातारा या शाखांकरीता स्वत:च्या मालकीच्या प्रशस्त जागा खरेदी केल्या आहेत.

## मान्यवरांच्या भेटी :-

अहवाल सालात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयासह विविध शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर, शासकीय अधिकारी तसेच संत महंतांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करुन माहिती घेतली त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे आणि प्रगतीचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

## अभिनंदनीय :-

संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. कृष्णा शेलार यांना हिंदवी या संस्थेतर्फे सहकार व सामाजिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केल्याबद्दल ''सहकार महर्षी'' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

तसेच अहवाल सालात श्री. पंढरीनाथ ता. भोसले यांची संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्व साधारण गटामधून ''संचालक'' तर श्री. पांडुरंग वि. घाडगे यांची ''तज्ञ संचालक'' म्हणून स्विकृती करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

## संचालक मंडळ :-

अहवाल सालात संस्थेच्या संचालक मंडळाच्या एकूण **५२** साप्ताहिक सभा झाल्या. सर्व सभांना बहुसंख्येने संचालक उपस्थित होते. संस्थेचे सर्व संचालक हे सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गास सदैव मार्गदर्शन करतात व संस्थेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचा प्रयत्न करतात.

संस्थेतील विविध विभागांचे कामकाज जलद गतीने व सुलभतेने होण्यासाठी संचालक मंडळा अंतर्गत असलेल्या कर्ज वितरण, कर्ज वसुली, नियोजन व विकास आणि लेखापरिक्षण या चार समित्यांच्या सभा वेळोवेळी आयोजित केल्या जातात. या समित्यांच्या सभांनाही समिती सदस्यांची उपस्थिती समाधानकारक राहिलेली आहे.तसेच दरमहा संस्थेचे संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी व शाखाधिकारी यांच्या संयुक्तरित्या Performance Review Meeting घेण्यात येत असून सदर सभांद्वारे उद्दिष्टपूर्तींचा आढावा घेण्यात येतो. आणि आवश्यक तेथे मार्गदर्शन करण्यात येते. संचालक मंडळाने संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून एकसंघपणे व आत्मीयतेने काम केल्यामुळेच आपल्या संस्थेची प्रगतीच्या दिशेने सतत वाटचाल चालू आहे.

## सामाजिक बांधीलकी :-

सहकार क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक बांधीलकी जपणे शिवकृपाने आपले आद्य कर्तव्य समजले आहे. अहवाल वर्षात केरळ अतिवृष्टी आपत्ती व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ₹ ५ लाख, वैष्णव व माऊली चॅरिटेबल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट यांना आषाढी वारीतील वारकऱ्यांच्या वैद्यकीय मदतीसाठी, सातारा जिल्हा ग्रंथ महोत्सव समिती यांना ग्रंथ महोत्सवाच्या आयोजनासाठी, मृदा व जलसंधारण समिती, जांब बु।। (पाणी फाउंडेशन) व जलविकास समिती, करंजखोप यांना आर्थिक सहाय्य केले आहे. तसेच कोरेगांव ता. कोरेगांव जि. सातारा येथे उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा ग्रामीण कॅम्प, कोरेगांव यांच्या मागणी नुसार नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोरेगांव शहरातील मुख्य चौकामध्ये सी. सी. कॅमेरे संस्थेतर्फे बसवण्यात आले आहेत. यासह विविध क्षेत्रामध्ये सामाजिक काम करणाऱ्या विश्वस्त संस्थांना आर्थिक मदत करून सामाजिक कार्यास हातभार लावलेला आहे.

अहवाल सालात महाराष्ट्र शासनाने वृक्ष लागवडीचा संकल्प केला होता. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामध्ये आपल्या संस्थेने सक्रीय सहभाग दिला. तसेच दुष्काळग्रस्त भागातील गावांना आर्थिक सहाय्यासह सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे व जनजागृती करण्याचे काम संस्थेने केलेले आहे.

## प्रशिक्षण :-

सेवक प्रशिक्षण हा खर्च नसून ती भविष्यातील फायदेशीर गुंतवणूक आहे. हा विचार आपल्या संस्थेने स्विकारला आहे. प्रशिक्षण हा उपक्रम अधिक व्यापक व दर्जेदार व्हावा म्हणून विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी निमंत्रित करण्यात येते. संस्थेच्या कर्मचाऱ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी अहवाल सालात सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था, कराड तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी संघ लि., पुणे संचलित सहकार प्रशिक्षण केंद्र मुंबई, सहकार प्रशिक्षण केंद्र पुणे, गुलाबराव पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र सांगली या शासन मान्यता प्राप्त संस्थांच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच संस्थेच्या कोरेगाव येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये ठेव संकलन प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले. या माध्यमातून संस्थेचे सर्व ६७० कर्मचारी तसेच ठेव संकलन प्रतिनिधी यांचेसाठी कर्ज वितरण, कर्ज वसुली, दस्तऐवज / कागदपत्रे पूर्तता व महत्व, एम्. आय्. एस्. प्रणाली व विपणन, व्यक्तिमत्व विकास व संगणक तसेच कोअर बॅकींग या विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले होते.

## चिंतन व प्रशिक्षण शिबीर :-

संस्थेचे पदाधिकारी, संचालक व अधिकारी यांचे १४ व १५ एप्रिल २०१८ या कालावधीमध्ये 'गिरीवन पिकनिक्स', लोणावळा, जि. पुणे येथे संयुक्त चिंतन शिबीर घेण्यात आले. संस्थेच्या कामकाजाचा व प्रगतीचा आढावा, पुढील वर्षाचा संकल्प व संकल्पपूर्तीचे नियोजन आणि धोरण यावर शाखानिहाय चर्चा करण्यात आली. या चिंतन शिबिरामुळे संस्थेच्या कामकाजामध्ये एकसूत्रीपणा व गतीमानता येवून उद्दिष्ट पूर्ण करणे शक्य झाले. दि. १२, १३ व १४ ऑक्टोबर २०१८ रोजी संस्थेचे पदाधिकारी, संचालक व अधिकारी यांचे श्री क्षेत्र काडसिध्देश्वर मठ, कणेरी, कोल्हापूर येथे अर्धवार्षिक कामकाजाची पूर्ती व पुढील अर्धवार्षिक संकल्पपूर्तीचे नियोजन आणि धोरण याचा आढावा घेणेसाठी चिंतन व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

## स्नेहसंवर्धन :-

सभासद हा संस्थेचा मुलभूत घटक आहे तर संचालक, ठेवीदार, ग्राहक, कर्मचारी व प्रतिनिधी हे संस्थेचे पोषक घटक आहेत. या सर्वांच्या डोळस वृत्तीमुळे संस्थेचा कारभार पारदर्शक होण्यास मदत होते. या सर्वांनी केलेल्या सहकार्यामुळेच संस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. या सर्वांच्यामध्ये सुसंवाद व समन्वय साधून स्नेह वृध्दिंगत करण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये अहवाल सालामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये दिनांक २२ नोव्हेंबर २०१८ रोजी वर्धापनदिनाचे औचित्य साधून सभासद, ठेवीदार खातेदार व हिंतचितक ग्राहकांसाठी स्नेहसंवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तर ०८ मार्च २०१९ रोजी संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय ''महिला दिन'' आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ६००० पेक्षा अधिक महिला उपस्थित होत्या. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कामकाजाबाबत सभासद व ग्राहक यांच्या सुचना व कल्पना समजून घेणे शक्य झाले. परिणामी त्यानुसार कामकाजामध्ये सुधारणा करण्यात आली. वर्धापनदिनी संस्थेचा संमिश्र व्यवसाय एका दिवशी रक्कम ₹ ४९.३४ कोटी एवढा झाला आहे. तर महिला दिनादिवशी संस्थेचा संमिश्र व्यवसाय रक्कम ₹ ३८.४३ कोटी एवढा झालेला आहे. हा व्यवसाय पुर्ण करण्यासाठी सर्व सभासद, ठेवीदार तसेच महिला खातेदार, सभासद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. असे विविध उपक्रम राबविण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाचा मनोदय आहे.

**कर्मचारी :-**

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. पांडुरंग विठ्ठल घाडगे (निवृत्त सहसचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन) हे दिनांक ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत संस्थेचे काम पाहत होते. त्यांचा कार्य कालावधी संपुष्टात आल्यामुळे दिनांक ०१ मार्च २०१९ पासून श्री. चंद्रकांत ह. शेळके, (निवृत्त मुख्याधिकारी, जनता सहकारी बँक लि, पुणे) यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. संस्थेच्या शाखांची मुंबई-१, मुंबई-२, ठाणे, सातारा, कोरेगांव, पुणे व सोलापूर या सात विभागांमध्ये विभागणी केलेली आहे. या सातही विभागांसाठी स्वतंत्र विभागीय अधिकारी, कर्जवितरण अधिकारी व कर्ज वसुली अधिकारी तसेच शाखाअंतर्गत तपासणी अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

अहवाल सालात संस्थेच्या सेवेत १ मुख्य कार्यकारी अधिकारी, ९ प्रशासकीय अधिकारी / विभाग प्रमुख , ७ विभागीय अधिकारी, ७ विभागीय कर्ज वितरण अधिकारी, ७ विभागीय कर्ज वसुली अधिकारी, ८७ शाखाधिकारी, ३९ अधिकारी, ४९८ लिपीक, १४ शिपाई व १ वाहन चालक असे एकूण ६७० कर्मचारी आपले काम कर्तव्य भावनेने पार पाडीत आहेत.

**ठेव संकलन प्रतिनिधी :-**

अहवाल सालात संस्थेमध्ये ९०६ दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी व ७८ शिवसागर ठेव संकलन प्रतिनिधी काम करीत असून संस्थेमध्ये एकूण ९८४ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या ठेवी वाढविण्यामध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. अहवाल सालात ३२ ठेव संकलन प्रतिनिधींची वाढ झाली आहे.

**गुणगौरव :-**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्राविण्य मिळविलेल्या सभासदांच्या ३२९ मुलांचा ''प्रशस्तीपत्रक'' व भेटवस्तू देवून संस्थेकडून ''गौरव'' करण्यात आला.

त्याचप्रमाणे संस्थेच्या सातही विभागातून सर्वाधिक दैनंदिन ठेव संकलन करणारे दहा व प्रत्येक विभागातून सर्वाधिक दैनंदिन ठेव संकलन करणाऱ्या दहा प्रतिनिधींचा गौरव करण्यात आला. तसेच संस्थेच्या सातही विभागातून सर्वाधिक शिवसागर ठेवीचे संकलन करणाऱ्या तीन व विभागनिहाय तीन शिवसागर ठेव संकलन प्रतिनिधींचा बक्षीस व प्रशस्तीपत्रक देवून गौरव करण्यात आला.

**संगणकीकरण / कोअर बँकींग :-**

नव तंत्रज्ञानाचे वाढते महत्व लक्षात घेऊन आपली संस्था गेली २३ वर्षे ग्राहकांना संगणकाद्वारे सेवा देत आहे. त्यामुळे संस्थेच्या खातेदारांना तत्पर, अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध होत आहे. परिणामी, ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास वृध्दिंगत झाला आहे. रिझर्व्ह बँकेने कोअर बँकींग ही प्रणाली सर्व बँकाना बंधनकारक केलेली आहे. त्याबाबत पतसंस्थांना अजून असे कोणतेही बंधन नसताना आपल्या संस्थेने सभासद, ग्राहक, ठेवीदार यांना तत्पर व अचूक सेवा देता यावी, संस्थेच्या सेवेचा दर्जा सुधारावा याकरीता कोअर बँकींग प्रणालीचा अवलंब केलेला आहे. संस्थेच्या सर्व शाखा कोअर बँकींग प्रणालीद्वारे जोडण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे ठेवसंकलन प्रतिनिधींद्वारे करण्यात येणाऱ्या ठेवीच्या संकलनासाठी संस्थेने मोबाईल ॲप विकसीत केले असून त्याद्वारे ग्राहकांकडून ठेवीचे संकलन करण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना त्वरीत ऑनलाईन सेवा मिळत आहे. तसेच ग्राहकांना वीज बिल कलेक्शन सुविधा, विमा सेवा, बी.बी.पी.एस. (भारत बिल पेमेंट सर्व्हिस) द्वारे वेगवेगळया पेमेंट करण्याच्या सुविधा संस्थेने सुरु केल्या आहेत. त्याचप्रमाणे सर्वत्र टेक्नोलॉजी यांच्या सहकार्याने मिनी ए.टी.एम. सेवाही सुरु केली आहे. यामुळे ग्राहकांना दर्जेदार सेवेचा लाभ मिळत आहे.

**संस्थेने अहवाल सालात केलेल्या दैदिप्यमान प्रगतीचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल :**

## १) सभासद :-

अहवाल सालाच्या सुरूवातीस एकूण १,९८,३४३ सभासद होते. त्यामध्ये ४५,५५६ नवीन सभासदांची वाढ झाली. राजीनामे दिलेल्या व सभासदत्व संपूष्टात आलेल्या एकूण ४,०३७ सभासदांची संख्या कमी झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेचे एकूण २,३९,८६२ सभासद आहेत.

## २) भाग भांडवल :-

आपल्या संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ₹१५०.०० लाख असून, अहवाल सालाच्या सुरूवातीस ₹ १०५३८.८६ लाख एवढे वसूल भाग भांडवल होते.

अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून कर्ज वाटपाच्या प्रमाणात जादा भाग भांडवल वसूल झाल्याने ₹ १७६४.५८ लाखाने वाढ होऊन वर्ष अखेरीस संस्थेकडे एकूण वसूल भाग भांडवल रक्कम ₹ १२३०३.४४ लाख झालेले आहे.

## ३) निधी :-

### अ) गंगाजळी (राखीव निधी) :-

अहवाल सालाच्या सुरूवातीस गंगाजळीमध्ये ₹ २५०१.५९ लाख जमा होते. अहवाल सालात जमा झालेली प्रवेश फी व सन २०१४-२०१५ सालाचा लाभांश सभासदांनी घेऊन न गेल्यामुळे सहकार कायद्यानुसार तो गंगाजळी मध्ये वर्ग करण्यात आलेला असून अहवाल सालाच्या अखेरीस एकूण रक्कम ₹ ३२००.५६ लाख गंगाजळी मध्ये जमा आहेत.

### ब) इमारत निधी :-

अहवाल सालाच्या सुरूवातीस इमारत निधीमध्ये ₹ ४७९५.४१ लाख जमा होते. अहवाल सालामध्ये रक्कम ₹ ७६२.८८ लाखांची वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण रक्कम ₹ ५५५८.२९ लाख इमारत निधी मध्ये जमा आहेत.

### क) अन्य निधी :-

अहवाल सालाच्या सुरूवातीस अन्य निधी मध्ये ₹ ८९०१.४४ लाख जमा होते. अहवाल सालामध्ये ₹ १३९३.५४ लाखाने वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण ₹ १०२९४.९८ लाख अन्य निधीमध्ये जमा आहेत.

## ४) गुंतवणूक :-

आपले उत्पन्न व नफा वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निधीचे योग्य नियोजन करुन गुंतवणूक करणे कामी संस्थेने विशेष लक्ष दिले आहे. कमीत कमी जोखीम व चांगली तरलता आणि सुयोग्य परतावा या मुख्य निकषांवर आधारित गुंतवणूकीचे निर्णय घेतले आहेत. तसेच C.R.R. व S.L.R. चे विहीत प्रमाण राखले आहे. त्यामुळे संस्थेने केलेली गुंतवणूक पूर्णत: सुरक्षित असून त्यापासून संस्थेस नियमित उत्पन्न मिळत आहे.

अहवाल सालाच्या सुरूवातीस अतिरिक्त व राखीव निधीची मुदत ठेवीपोटी विविध बँकामध्ये एकूण रक्कम ₹ ६१९५२.०४ लाख गुंतवणूक केलेली होती. तर माहे मार्च २०१९ अखेर संस्थेचे एकूण गुंतवणूक रक्कम ₹ ७४८२३.३१ लाख एवढी आहे.

**प्रगती दर्शक तक्ता** (₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | सन | | | | मागील वर्षाच्या तुलनेने | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | वाढ/घट | टक्के |
| १ | सभासद (संख्या) | १,२२,२६७ | १,४९,१०७ | १,९८,३४३ | २,३९,८६२ | ४१,५१९ | २०.९३ |
| २ | भाग भांडवल | ७३४०.९५ | ८८६९.५५ | १०५३८.८६ | १२३०३.४४ | १,७६४.५८ | १६.७४ |
| ३ | निधी | | | | | | |
| | अ) राखीव निधी | १४८१.७५ | १९७५.१५ | २५०१.५९ | ३२००.५६ | ६९८.९७ | २७.९४ |
| | ब) इमारत निधी | ३२५३.४० | ३९०१.४८ | ४७९५.४१ | ५५५८.२९ | ७६२.८८ | १५.९१ |
| | क) अन्य निधी | ५८०४.८६ | ७६१६.२० | ८९०१.४४ | १०२९४.९८ | १,३९३.५४ | १५.६६ |
| ४ | गुंतवणूक | ५३८८७.८१ | ५२८४२.५७ | ६१९५२.०४ | ७४८२३.३१ | १२,८७१.२७ | २०.७८ |

## ५) ठेवी :-

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्थेने वेगवेगळे उपक्रम आयोजित केलेले होते. तसेच संस्थेच्या विविध ठेव योजनांचा नियमितपणे आढावा घेण्यात आला व त्यात काळानुरुप वेळोवेळी व्याजदरात आवश्यक ते बदल करण्यात आले. यामुळे अहवाल सालात ठेवींमध्ये वाढ झालेली आहे.

अहवाल सालाच्या सुरूवातीस संस्थेच्या विविध ठेवींमध्ये ₹ १७५३७१.२८ लाख जमा होते. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹ १९००९.१० लाखाने वाढ झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेच्या विविध ठेवींमध्ये ₹ १९४३८०.३८ लाख जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये ठेवींमध्ये १०.८४ % वाढ झालेली आहे.

## ६) कर्जे :-

कर्जव्यवहार हा संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. त्याअनुषंगाने बदलत्या काळानुसार व ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवून संस्थेने विविध कर्ज योजना तयार केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहुसंख्य सभासदांनी घेतला आहे.

अहवाल सालाच्या सुरूवातीस ₹ १३४६४९.१६ लाख कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना ₹ ४९२९८.५८ लाख नव्याने कर्ज वाटप केले असून ₹ ३७८०७.६१ कर्ज वसूल झालेले आहे. वर्ष अखेरीस एकूण ₹ १४६१४०.१३ लाख कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये ८.५३ % वाढ झालेली दिसून येत आहे.

## ७) कर्ज थकबाकी व वसुली :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक यांनी सन २००५-०६ पासून अनुत्पादक कर्जाचे (N.P.A.) निकष पतसंस्थांसाठी लागू केले आहेत. त्यामुळे संस्थेचा वसुली विभाग अनुत्पादक कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे संचालक मंडळ व वसुली समिती वेळोवेळी कर्ज वसुलीची मोहिम राबवित आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली समिती, वसुली अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामीनदारांशी संपर्क साधून कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

## ८) एन. पी. ए. :-

सहकार खात्याने प्रसारीत केलेल्या एन. पी. ए. च्या निकषानुसार एन. पी. ए. पोटी रक्कम ₹ ३१७९.२२ लाख तरतूद करणे आवश्यक होते. मात्र ही तरतूद आपल्या संस्थेने रक्कम ₹ ४६८४.२७ लाख केलेली आहे. आवश्यक तरतूदीपेक्षा रक्कम ₹ १५०५.०५ लाख अधिक तरतूद केली आहे.

## ९) संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे :-

अहवाल वर्षामध्ये संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे व वसुली याचा तपशिल पुढीलप्रमाणे :

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशील | ३१.०३.१८ | २०१८-१९ | | ३१.०३.१९ अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अखेर येणे कर्ज | दिलेले कर्ज | एकूण वसूल कर्ज | अखेर येणे कर्ज | थकीत रक्कम | थकबाकीचे शे. प्रमाण |
| १ | संचालक | ६८.१३ | ०.०० | १२.४२ | ५५.७१ | ११.६१ | २०.८४ |
| २ | नातेवाईक | १५२.४९ | ४०.०० | ७६.२८ | ११६.२१ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **२२०.६२** | **४०.००** | **८८.७०** | **१७१.९२** | **११.६१** | **२०.८४** |

## १०) नफा विभागणी :-

अहवाल साली संस्थेस एकूण खर्च वजा जाता ₹ २६,८०,८३,७२०.३२ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा ₹ १००१.०० मिळून एकूण नफा रक्कम ₹ २६,८०,८४,७२१.३२ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी, ही विनंती.

| | | | |
|---|---|---|---|
| गंगाजळी (३०%) | : | ₹ | ८,०४,२५,४१६.०० |
| लाभांश (१२.००%) | : | ₹ | १३,३७,५८,८६५.०० |
| इमारत निधी | : | ₹ | ४,५७,९९,३८९.३२ |
| लाभांश समतोल निधी | : | ₹ | १५,००,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | : | ₹ | १०,००,०००.०० |
| निवडणूक निधी | : | ₹ | १५,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | : | ₹ | १२,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सवी वर्ष निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| समाज कल्याण निधी | : | ₹ | ५,००,०००.०० |
| व्यवसाय वृद्धी निधी | : | ₹ | १४,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | : | ₹ | १,०५१.०० |
| **एकूण** | | ₹ | **२६,८०,८४,७२१.३२** |

## ११) हिशोब तपासणी :-

### अ) समवर्ती लेखापरिक्षण :-

सन २०१८–१९ या वर्षाचे समवर्ती लेखापरिक्षण मे. अंबावत जैन ॲन्ड असोसिएट्स एल. एल. पी. सी. ए. संजय पवार यांसह घोरपडे मराठे ॲन्ड असोसिएट्स, निलेश शिंदे, दिपक व्यवहारे, विजयकुमार क्षीरसागर, अमित निकम, उत्तम डी. बनकर व इतर सर्व कार्यरत समवर्ती लेखापरिक्षक यांनी केलेले असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

### ब) शासकीय लेखापरिक्षण :-

सन २०१८–१९ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षण सनदी लेखापाल मे. आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट यांनी केले आहे. त्यांनी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** दिलेला असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

## १२) श्रध्दांजली :-

अहवाल सालात संस्थेचे जे सभासद, ठेवीदार, हितचिंतक तसेच राष्ट्रीय किर्तीच्या ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी यासाठी शिवकृपा परिवाराच्यावतीने ईश्वरचरणी प्रार्थना !

## १३) आभार :-

संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक आणि खातेदार यांनी संस्थेच्या कामकाजात केलेल्या सक्रिय सहकार्यामुळेच संस्थेला प्रगतीची वाटचाल करणे शक्य झाले आहे. अशा सर्व व्यक्तींचा संचालक मंडळाच्या वतीने मी प्रथमत: आभारी आहे.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, सहकार व विविध खात्यांचे मंत्री यांचे मनस्वी आभार.

महाराष्ट्राचे मा. सहकार सचिव, सहकार आयुक्त व निबंधक, अप्पर निबंधक तसेच राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक त्याचप्रमाणे सहकार खात्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे संस्थेस अत्यंत चांगले सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे त्यांचेही आभार !

महाराष्ट्र राज्य सहकार परिषद, सहकार भारती, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन त्याच बरोबर राज्यातील सर्व जिल्हयातील सहकारी पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी व संचालक यांचे मन:पूर्वक आभार !

मुंबई सहकारी बोर्ड त्याचप्रमाणे राज्याच्या सर्व जिल्हयातील सहकारी बोर्डाचे व सर्व जिल्हा बँकांचे पदाधिकारी व संचालक यांचे मन:पूर्वक आभार! संस्थेचे शासकीय लेखापरिक्षक मे. आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, समवर्ती लेखापरिक्षक मे. अंबावत जैन ॲण्ड असोसिएटस, एल. एल. पी., सी. ए. संजय पवार यासह सर्व समवर्ती लेखापरिक्षक (Concurrent Auditor Team) त्याचबरोबर संस्थेचे सर्व कायदेविषयक सल्लागार या सर्वांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सखोल मार्गदर्शन केले आहे. त्याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

संस्थेचे कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी यांनी समर्पित भावनेने दिलेल्या ग्राहक सेवेमुळेच संस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यांचे संचालक मंडळ कौतुकपुर्ण उल्लेख करु इच्छिते. संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी-माजी संचालकांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार !

आपण देत असलेल्या सततच्या पाठिंब्यामुळे पुढील आर्थिक वर्ष पुन्हा एकदा सर्वांगीण प्रगतीचे असेल अशी संचालक मंडळाच्या वतीने ग्वाही देवून आपले सहकार्य असेच उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

पुनश्च: एकदा सर्व सभासद बंधु भगिनींचे आभार मानून अहवाल पूर्ण करीत आहे. धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**कृष्णा तु. शेलार**
**संस्थापक व अध्यक्ष**

## दि. ३१ मार्च २०१९ अखेरचे

| 31.03.2018 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 134,73,26,279.79 | **INTEREST ON DEPOSIT / ठेवीवरील व्याज** | | 144,37,53,949.26 |
| 8,52,221.00 | **INTEREST ON BORROWING / घेतलेल्या कर्जावरील व्याज** | | |
| | 1. LOAN AGAINST FIXED DEPOSIT / ठेवतारण कर्जावरील व्याज | | 1,55,01,814.00 |
| | **SALARY & ALLOWANCES / पगार व भत्ते** | | |
| 22,24,51,401.00 | 1. STAFF SALARY / कर्मचारी पगार | 27,10,35,387.00 | |
| 1,83,68,095.00 | 2. EMPLOYER P.F.CONT. / संस्थेचे अंशदान भ.नि.निधी | 2,01,57,597.00 | |
| 9,65,307.00 | 3. P.F. ADMIN. EXP / भ.नि. वरील प्रशासकीय खर्च | 8,81,092.00 | |
| 2,07,25,414.00 | 4. BONUS PAYABLE / बोनस देय | 1,86,86,774.00 | |
| 1,00,00,000.00 | 5. GRATUITY & LEAVE ENCASHMENT / ग्रॅच्युईटी व रजा रोखीकरण | 2,26,37,900.00 | 33,33,98,750.00 |
| | **PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी** | | |
| 1,08,31,509.48 | PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी | 1,07,53,913.98 | |
| 52,67,740.74 | LESS STOCK OF STATIONERY / वजा छपाई साठा | 52,49,103.49 | 55,04,810.49 |
| | **ADMINISTRATIVE EXPENSES / प्रशासकीय खर्च** | | |
| 23,68,641.70 | 1. CONVEYANCE / प्रवास | 21,51,869.50 | |
| 7,84,467.28 | 2. ADVERTISEMENT / जाहिरात | 15,29,492.00 | |
| 13,44,352.04 | 3. POSTAGE / टपाल | 19,20,237.25 | |
| 13,58,94,969.25 | 4. AGENT COMMISSION / प्रतिनिधी कमिशन | 15,52,03,399.50 | |
| 87,66,460.00 | 5. OFFICE RENT / कार्यालयीन भाडे | 1,11,37,950.00 | |
| 1,39,77,757.70 | 6. ELECTRICITY / विद्युत | 1,46,10,661.00 | |
| 44,97,227.29 | 7. TELEPHONE / टेलिफोन | 47,35,459.68 | |
| 50,70,049.92 | 8. INSURANCE / विमा | 49,11,978.00 | |
| 33,95,150.00 | 9. AUDIT FEES / ऑडिट फी | 59,96,250.00 | |
| 32,67,691.00 | 10. TAXES / कर | 35,34,374.22 | 20,57,31,671.15 |
| | **OTHER EXPENSES / इतर खर्च** | | |
| 1,51,21,567.52 | 1. OFFICE REPAIRS & MAINTENANCE / कार्या. देखभाल व दुरुस्ती | 1,84,52,120.53 | |
| 12,158.00 | 2. NEWS PAPER / वर्तमानपत्र | 9,422.00 | |
| 8,45,322.00 | 3. XEROX / झेरॉक्स | 10,09,683.50 | |
| 5,32,220.06 | 4. POOJA / पूजा | 5,50,617.00 | |
| 20,40,813.80 | 5. INAUGURATION & FUNCTION / उद्घाटन व समारंभ | 20,30,787.52 | |
| 80,39,436.53 | 6. MISC. EXPS. / किरकोळ खर्च | 81,21,877.97 | |
| 26,71,959.00 | 7. PROFESSIONAL FEE / व्यावसायिक फी | 15,88,007.00 | |
| 90,150.77 | 8. BANK CHARGES / बँक शुल्क | 0.00 | |
| 1,67,770.00 | 9. LOCKERS RENT / लॉकर्स भाडे | 1,90,597.00 | |
| 26,45,578.00 | 10. TRAINING / प्रशिक्षण | 18,46,822.34 | |
| 3,53,697.00 | 11. WATER / पाणी | 4,22,642.60 | |
| 183,81,39,925.39 | **BALANCE C/F / पुढील पानावर .....** | | 200,38,90,994.90 |

## नफा-तोटा पत्रक

| 31.03.2018 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **INTEREST RECEIVED / मिळालेले व्याज** | | |
| 175,64,07,189.77 | 1. ON LOAN / कर्जावरील | 193,93,46,154.72 | |
| 44,30,31,130.00 | 2. ON BANK DEPOSIT / बँक ठेवीवरील | 53,54,50,346.36 | |
| 19,77,732.21 | 3. ON LIQUID FUND / लिक्वीड फंड | 31,37,107.61 | |
| 7,16,110.00 | 4. ON MSEDCL DEPOSIT / एम.एस.ई.डी.सी.एल. ठेवीवरील | 3,64,000.00 | |
| 0.00 | 5. ON INCOME TAX INT REC / आयकर खातेवरील मिळालेले व्याज | 6,31,434.00 | 247,89,29,042.69 |
| | **OTHER INCOME / इतर जमा** | | |
| 3,599.00 | 1. DIVIDEND/ लाभांश | 250.00 | |
| 3,68,42,617.00 | 2. SERVICE CHARGES / सेवा शुल्क | 3,73,70,839.19 | |
| 56,97,398.00 | 3. RECOVERY CHARGES / वसुली शुल्क | 1,00,68,907.29 | |
| 0.00 | 4. BANK CHARGES / बँक शुल्क | 1,45,203.13 | |
| 70,650.00 | 5. TENDER FEE / निविदा शुल्क | 97,300.00 | |
| 17,100.00 | 6. LOCKER RENT RECD. / लॉकर भाडे | 19,700.00 | |
| 0.00 | 7. BUSINESS CORRESPONDENT RECEIPT | 26,10,755.72 | |
| 0.00 | 8. MAHARASHTRA GOVT. PRIZE RECEIVE/पुरस्कार प्राप्त रक्कम | 51,000.00 | |
| 0.00 | 9. SARVATRA MINI ATM ROI / सर्वत्र मिनी ए.टी.एम. | 300.00 | |
| 82,84,432.00 | 10. PROFIT ON SALE OF ASSET / मालमत्ता विक्रीतून झालेला नफा | 0.00 | 5,03,64,255.33 |
| | **COMMISSION / कमिशन जमा** | | |
| 5,64,898.00 | 1. MSEDCL / एम.एस.ई.डी.सी.एल. | 4,75,592.04 | |
| 20,416.00 | 2. DEMAND DRAFT / डिमांड ड्राफ्ट | 3,471.00 | |
| 0.00 | 3. BBPS / बी.बी.पी.एस. | 21,302.66 | |
| 0.00 | 4. SARVTRA MINI ATM / सर्वत्र मिनी ए.टी.एम. | 3,510.21 | 5,03,875.91 |
| 14,22,777.38 | 5. INSURANCE / विमा | 0.00 | |
| 1,010.80 | 6. RBL BANK / रत्नाकर बँक लि. | 0.00 | |
| 225,50,57,060.16 | BALANCE C/F / पुढील पानावर ..... | | 252,97,97,173.93 |

## दि. ३१ मार्च २०१९ अखेरचे

| 31.03.2018 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 183,81,39,925.39 | **BALANCE B/F / मागील पानावरून.....** | | 200,38,90,994.90 |
| 11,71,854.00 | 12. UNIFORM / गणवेश | 15,57,292.36 | |
| 1,67,750.00 | 13. EMP. HELP EXP. / कर्मचारी सहाय्यता खर्च | 0.00 | |
| 2,65,739.00 | 14. INT. ON EMP. HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी व्याज | 2,78,403.00 | |
| 1,31,400.00 | 15. MEDICAL EXPENSES / वैदयकिय खर्च | 1,60,000.00 | |
| 0.00 | 16. LOSS ON SALE OF ASSETS / मालमत्ता विक्रीतून झालेले तोटा | 2,23,388.00 | |
| 2,61,890.00 | 17. LEGAL FEE / कायदेविषयक फी | 96,200.00 | |
| 1,05,606.28 | 18. STORAGE EXPS. / स्टोरेज खर्च | 1,06,668.08 | |
| 0.00 | 19. INT. PAID ON INCOME TAX / आयकर खाते व्याज | 12,552.00 | |
| 93,24,219.46 | 20. EXP. ON I. T. SERVICES / माहिती तंत्रज्ञानावरील खर्च | 1,24,53,007.18 | |
| 88,72,842.60 | 21. GST / वस्तु व सेवा कर | 71,46,124.89 | |
| 0.00 | 22. INCOME TAX / आयकर खाते | 6,56,708.60 | |
| 0.00 | 23. RENT PAID ON SARVTRA MINI ATM / सर्वत्र मिनी एटीएम भाडे | 64.00 | |
| 4,42,717.04 | 24. SERVICE TAX / सेवा कर | 0.00 | |
| 45,513.00 | 25. AGENT CONVEYANCE EXPS./ ठेव संकलन प्रतिनिधी प्रवास खर्च | 0.00 | 5,69,12,985.57 |
| | **MEETING EXPENSES / सभा खर्च** | | |
| 8,38,371.00 | 1. DIR.MTG.ALLOWANCES / संचालक सभा भत्ता | 8,45,576.00 | |
| 7,25,821.04 | 2. A.G.M. EXPENSES / वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | 9,24,060.90 | 17,69,636.90 |
| 4,13,86,779.16 | **DEPRECIATION / घसारा** | | 4,20,52,346.24 |
| | **PROVISION U/S 65 OF MCS ACT 1960 महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ६५ खालील तरतूदी** | | |
| 7,02,25,253.00 | 1. PROV. FOR BAD & DEBT / बुडीत व संशयित कर्ज | 11,44,57,000.00 | |
| 71,17,962.00 | 2. PROV. ON STAND. ASSET / उत्पादित कर्जावरील तरतूद | 26,30,490.00 | |
| 2,00,00,000.00 | 3. PROV FOR CONTIGENCY EXP./आपत्कालीन खर्च तरतूद | 2,00,00,000.00 | |
| 2,00,00,000.00 | 4. PROV. FOR GEN. RES. FUND EXP./जनरल रिझर्व्ह खर्च तरतूद | 1,00,00,000.00 | |
| 50,00,000.00 | 5. PROV. EXPS. FOR OVDU. INT. RESER./ थकीत व्याज तरतूद | 1,00,00,000.00 | 15,70,87,490.00 |
| 23,08,33,417.19 | **NET PROFIT TRANSFER TO B/S निव्वळ नफा ताळेबंद पत्रकास वर्ग** | | 26,80,83,720.32 |
| 225,50,57,060.16 | **TOTAL / एकूण** | | 252,97,97,173.93 |

सदर तारखेच्या दिलेल्या स्वतंत्र अहवालाप्रमाणे

ठिकाण : मुंबई
दिनांक : ७ ऑगस्ट २०१९

**मे.आर.आर. पिंगळे ॲण्ड कंपनी**
सही/-
**सी. ए. आर. आर. पिंगळे**
प्रोप्रायटर (स.न.१०३८११) FRN - 117610W
(वैधानिक लेखापरीक्षक)

**मे.अंबावत जैन ॲण्ड असोसिएट्स एलएलपी**
सही/-
**सी. ए. संजय पवार**
भागीदार (स.न.१२६३०५) FRN - 109681W
(अंतर्गत हिशोब तपासणीस)

## नफा-तोटा पत्रक

| 31.03.2018 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 225,50,57,060.16 | BALANCE B/F मागील पानावरून..... | | 252,97,97,173.93 |
| 225,50,57,060.16 | TOTAL / एकूण | | 252,97,97,173.93 |

**शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई करिता**

**श्री. चंद्रकांत ह. शेळके**
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक

**श्री. वसंत खा. चव्हाण**
उपाध्यक्ष

**श्री. कृष्णा तु. शेलार**
संस्थापक व अध्यक्ष

दि. ३१ मार्च २०१९ रोजीचे

| 31.03.2018 ₹ पै. | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **SHARE CAPITAL / भाग भांडवल** | | |
| 150,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL / अधिकृत भाग भांडवल** | | 150,00,00,000.00 |
| 105,38,85,700.00 | **PAID UP SHARE CAPITAL / वसूल भाग भांडवल** | | 123,03,44,200.00 |
| | **RESERVE FUND & OTHER RESERVES राखीव निधी व इतर निधी** | | |
| 25,01,58,593.65 | 1. RESERVE FUND / राखीव निधी | 32,00,55,530.65 | |
| 47,95,40,505.45 | 2. BUILDING FUND / इमारत निधी | 55,58,28,638.64 | |
| 24,57,03,664.62 | 3. RES. FOR B. & D. FULL DEBTS / बुडीत व संशयित कर्ज निधी | 36,01,60,664.62 | |
| 10,82,66,065.48 | 4. ADDITIONAL R. B. D.D / अतिरिक्त बुडीत व संश. कर्ज निधी | 10,82,66,065.48 | |
| 1,15,000.00 | 5. RES. R.B.D.D. INVESTMENT / बुडीत व संश.निधी - गुंतवणूक | 1,15,000.00 | |
| 1,35,67,335.00 | 6. DIV. EQUALISATION FUND / लाभांश समतोल निधी | 1,45,67,335.00 | |
| 6,00,000.00 | 7. CHARITABLE FUND / धर्मादाय निधी | 6,00,000.00 | |
| 48,26,636.00 | 8. EMPLOYEES WELFARE FUND / कर्मचारी कल्याण निधी | 53,15,711.00 | |
| 94,50,850.00 | 9. CO-OP. EDUCATION FUND / सहकार प्रशिक्षण निधी | 1,09,50,850.00 | |
| 30,18,085.00 | 10. SOCIAL WELFARE FUND / समाजकल्याण निधी | 21,04,825.80 | |
| 23,84,75,691.00 | 11. CONTIGENCY FUND / आपत्कालीन निधी | 24,49,09,021.00 | |
| 32,59,041.00 | 12. ELECTION FUND / निवडणूक निधी | 42,59,041.00 | |
| 33,23,713.00 | 13. EMP. HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी | 29,46,316.00 | |
| 9,52,13,201.00 | 14. RES. FOR STANDARD ASSETS / उत्पादित कर्ज निधी | 9,78,43,691.00 | |
| 27,32,568.00 | 15. GOLDEN JUBILEE CELE. FUND/ सुवर्णमहोत्सव निधी | 32,32,568.00 | |
| 4,70,00,000.00 | 16. INFORMATION TECH. FUND/ माहिती तंत्रज्ञान निधी | 4,80,00,000.00 | |
| 10,33,68,832.33 | 17. GENERAL RESERVE FUND/ जनरल रिझर्व्ह निधी | 11,33,68,832.33 | |
| 1,12,23,665.00 | 18. RES. FOR OVERDUE INT. / थकीत व्याज निधी | 1,28,58,340.00 | 190,53,82,430.52 |
| | **DEPOSITS / ठेवी** | | |
| 86,81,10,304.91 | 1. SAVING DEPOSIT / बचत ठेव | 97,07,48,068.40 | |
| 1,78,252.00 | 2. MY SAVING DEPOSIT / माझी बचत ठेव | 86,539.00 | |
| 228,46,52,056.82 | 3. DAILY DEPOSIT / दैनंदिन ठेव | 242,96,45,252.38 | |
| 15,02,16,828.00 | 4. RECURRING DEPOSIT / आवर्त ठेव | 15,45,65,834.00 | |
| 2,70,37,099.00 | 5. SHIVSAGAR DEPOSIT / शिवसागर ठेव | 2,40,06,882.00 | |
| 16,40,26,992.00 | 6. SHIVAMRUT LAKSHADHISH DEPOSIT/ शिवांमृत लक्षाधीश ठेव | 18,47,40,198.00 | |
| 595,36,83,263.77 | 7. FIXED DEPOSIT / मुदत ठेव | 612,89,17,937.00 | |
| 137,12,90,937.00 | 8. MONTHLY INCOME DEPOSIT / मासिक प्राप्ती ठेव | 151,96,75,468.00 | |
| 27,20,99,817.00 | 9. DOUBLE BENEFIT DEPOSIT / दामदुप्पट ठेव | 34,34,76,941.00 | |
| 16,03,98,187.00 | 10. SECURITY DEPOSIT / सुरक्षित ठेव | 16,06,17,405.00 | |
| 183,28,13,056.00 | 11. SHIVSAMRUDDHI DEPOSIT / शिवसमृध्दी ठेव | 323,26,99,631.00 | |
| 1575,82,35,940.03 | **BALANCE C/F / पुढील पानावर .....** | | 313,57,26,630.52 |

## ताळेबंद पत्रक

| 31.03.2018 ₹ पै. | PROPERTY & ASSETS / मालमत्ता व येणी | ₹ पै. | 31.03.2019 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | CASH & BANK BALANCES / रोख व बँक शिल्लक | | |
| 2,65,54,648.00 | 1. CASH IN HAND / रोख शिल्लक | 2,64,92,286.00 | |
| 9,54,95,163.75 | 2. CASH AT BANK / बँक शिल्लक | 6,43,96,454.11 | 9,08,88,740.11 |
| | INVESTMENTS / गुंतवणूक | | |
| | I. BANK INVESTMENTS / बँक गुंतवणूक | | |
| | A. INVESTMENTS FOR RES. FUND / राखीव निधी पोटी गुंतवणूक | | |
